खाजगी उद्योगांची त्यांच्या उपयोगासाठी, मोजक्या प्रेक्षकांसाठी बांधलेली ऑडिटोरिअम्स आहेत. सबंध वर्षात जेमतेम दहा बारा दिवस वापरली जाणारी ही प्रेक्षागृहं उरलेले दिवस धूळ खात असतात. प्रायोगिक संस्थांनी एकत्र येऊन अशा संस्थांच्या चालकांना प्रातिनिधिक स्वरुपात आवाहन केलं तर यश मिळायला हरकत नाही असं मला वाटतं. अशा प्रयत्नांना नाट्यपरिषद अवश्य सहकार्य देईल.

प्रयत्नानं हे शक्य होईल असं मला वाटतं. मुंबईच्या दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्रानं स्वत:च्या उपयोगासाठी बांधलेला सुसज्ज रंगमंच हा प्रायोगिक नाटकांसाठी उपलब्ध करुन दिला आहे. इतकंच नाही तर हा रंगमंच कोणत्याही नाट्यसंस्थेला प्रायोगिक नाटकाच्या आपल्या मुंबईतल्या पहिल्या प्रयोगासाठी विनामूल्य दिला जातो. आणि देणगी प्रवेशिकांतून होणारं उत्पन्न प्रयोग करणाऱ्या संस्थेचं असतं. हा आदर्श गिरवण्यासाठी अन्य संस्था पुढे येतील अशी मी आशा करतो.

प्रायोगिक रंगभूमीप्रमाणेच बालरंगभूमीची संकल्पना ही स्वातंत्र्योत्तर काळातली. स्वातंत्र्यपूर्व काळात बालरंगभूमी ही संकल्पना नव्हती. मुलांसाठी, 'सकाळचा अभ्यास' किंवा 'गड आला पण सिंह गेला' असे तुरळक अपवाद सोडल्यास जाणीवपूर्वक लेखन झालेलं नव्हतं. १९५० नंतरच्या दशकात ही संकल्पना उदयास आली. बाल रंगभूमीला निश्चित दिशा देण्याचा प्रयत्न केला तो रत्नाकर मतकरी, सुधा करमरकर, सई परांजपे आणि काही प्रमाणात पुल आणि विजय तेंडुलकर यांनी. लेखन, आशय, नेपथ्य, सादरीकरण या सर्वच घटकांत रत्नाकर मतकरीनी दाखवलेली कल्पकता आणि प्रयोगशीलता वाखाणण्यासारखी आहे. अद्भुतता, कल्पनारम्यता, विनोदाचा वापर ह्या प्रारंभीच्या बालप्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या फॉर्म्युल्यानं बालरंगभूमीला प्रेक्षक दिला. पण नंतर अनेक अन्य लेखकांनी अगदी आजपर्यंत हाच फॉर्म्युला वापरला. बालरंगभूमी ही आता चळवळ राहिली नसून तो एक किफायतशीर धंदा झाला आहे. सुट्ट्यांच्या काळात बालनाट्यांच्या जाहिरातीतली नुसती नाटकांची नावं वाचली तरी बालरंगभूमीची काय अवस्था आहे हे लक्षात येतं. संख्यात्मक वाढ म्हणजे विकास नव्हे. सध्याची बालनाट्यं म्हणजे अनेक वेगवेगळ्या नावांनी केलेलं एकच नाटक असतं. मीना नाईक यांनी केलेली हेतूप्रधान नाटकांची लक्षणीय निर्मिती आणि ग्रीप्स थिएटरची संकल्पना अतिशय परिणामकारकतेने राबवणारे श्रीरंग गोडबोले असे काही तुरळक स्तुत्य अपवाद सोडले तर बालरंगभूमीचं एकूण चित्र बटबटीत आणि ढोबळ आहे. मुलांच्या